सातारा, शुक्रवार, १६ जून २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# डी. पी. भोसले महाविद्यालयात आज माजी विद्यार्थी-गुरुवर्य स्नेहमेळावा

**सातारा, ता. १५ :** कोरेगाव येथील एक्स-डीपीयन्स असोसिएशन द्वारा डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या वतीने उद्या (शुक्रवार) सायंकाळी चार वाजता महाविद्यालयात 'माजी विद्यार्थी- गुरुवर्य स्नेहमेळावा २०१७-२०१८' आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील उपस्थित राहणार आहेत.

एक्स-डीपीयन्स असोसिएशनचे अध्यक्ष व नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक प्रतापसिंह पाटणकर अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. असोसिएशनचे उपाध्यक्ष व मुंबई येथील महाराष्ट्र (अ प्लस) न्यायाधिकरणाचे अध्यक्ष अश्विनकुमार देवरे, असोसिएशनचे उपाध्यक्ष व अलिबागचे निवृत्त पोलिस उपअधीक्षक प्रशांत बगाडे, रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (उच्च शिक्षण) प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. स्नेहमेळाव्यास माजी विद्यार्थी- गुरुवर्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन असोसिएशनचे सचिव विजयकुमार घार्गे, खजिनदार दीपक देवरे, पदाधिकाऱ्यांनी केले आहे.